मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# भोसरी, दिघी, परिसरात शिवजयंती उत्साहात

## भगवे झेंडे मिरवत तरूणांनी काढलेली मिरवणूक लक्षवेधी



**भोसरी**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** रांगोळ्याच्या पायघड्या...‘छत्रपती शिवाजी महाराजांचा विजय असो’चा जयघोष... आकर्षक फुलांनी सजवलेला परिसर...फटाक्यांची आतषबाजी आणि भगवे झेंडे मिरवत तरूणांनी काढलेली मिरवणूक अशा वातावरणात भोसरी, दिघी, इंद्रायणीनगर परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. भोसरीतील पीएमटी चौक आणि लांडेवाडीतील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ नागरिकांनी फटाक्यांची आतषबाजी करत रविवारी रात्रीपासूनच छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा जयघोष केला. भोसरी परिसरातून पहाटे तरुणांनी प्रभातफेरी काढली. चौकांमध्ये दिवसभर छत्रपती शिवाजी महाराजांचे पोवाडे लावण्यात आले होते. भोसरीतील लांडेवाडीतील राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात घेण्यात आलेल्या कार्यक्रमात पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी आमदार विलास लांडे, सुधीर मुंगसे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, प्राचार्य डॉ. के. जी. कानडे, उपप्राचार्य प्रा. किरण चौधरी, रात्र महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. श्रेया दाणी, रजिस्ट्रार अश्विनी चव्हाण, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. गणेश चव्हाण, प्रा. गोपीचंद करंडे आदी उपस्थित होते. महाविद्यालय ते लांडेवाडीतील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत शोभायात्रा काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थी व विद्यार्थिनींनी पारंपरिक वेशभूषा केली होती. भोसरीतील दिघी रस्त्यावरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर गार्डनमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती नेत्र तपासणी शिबिर आयोजित करून साजरी करण्यात आली. यात साडेचारशे नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. या वेळी धम्मदूत मैत्री संघाचे अध्यक्ष पंकेश डोळस, अनिकेत कांबळे, वृषभ ढसाळ, सिध्दार्थ गोलाने, साहिल शेख, आदित्य गायकवाड, ऋत्विक भोसले, शुभम ढसाळ आदी उपस्थित होते. शिबिराचे आयोजन धम्मदूत मैत्री संघ, अनिकेत कांबळे फ्रेंड सर्कल, आयकॉन डोळ्यांचा दवाखाना आदींनी केली. लांडेवाडीतील शिवसृष्टीमधील मेघडंबरीत रांगोळी कलाकार भूषण खंडारे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची आकर्षक रांगोळी काढली होती. रांगोळी बघण्यास नागरिकांनी गर्दी केली होती. इंद्रायणीनगरातील जयगणेश साम्राज्य मित्र मंडळ, क्षत्रिय प्रतिष्ठान, श्री संजय वाबळे प्रतिष्ठान आदी ठिकाणी घेण्यात आलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती महोत्सवात माजी नगरसेवक संजय वाबळे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन केले. दिघीतील छत्रपती संभाजी महाराज चौकात राजकीय आणि सामाजिक संघटनांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन केले.

## पिंपळे सौदागर मधील चॅलेंजर पब्लिक स्कूलमध्ये शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी



**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपळे सौदागर मधील चॅलेंजर पब्लिक स्कूलमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती प्रमुख पाहुणे व शाळेचे संचालक संदीप काटे यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरी झाली. या कार्यक्रमामध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांसह भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. शिवजयंती निमित्त शाळेतील ५ वी व ६ वी च्या विद्यार्थ्यांनी नाट्यमय पोवाडा सादर केला. तसेच इ. ८ वी चा विद्यार्थी आयुष सोनवणे याने पोवाडा सादर केला. इ.१ ली ते ६ वी च्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर भाषण केले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा परिधान केले होते, त्यामुळे या कार्यक्रमाची शोभा वाढली. शिवजयंतीचे व भव्य रॅलीचे आयोजन हे शाळेच्या उप. मुख्याध्यापिका सुविधा महाले मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाला सहकार्य मयूर काळे सर शिक्षकवर्ग, अमर, सागर काटे यांनी केले.

## थेरगावमध्ये घरात आढळला महिलेचा संशयास्पद मृतदेह

**वाकड**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** थेरगावमध्ये वनदेव आनंदवन नगर येथील एका घरात रविवारी (ता. १८) सायंकाळी विवाहितेचा संशयितरित्या मृतदेह आढळून आला आहे. मेघा लखन जुरांडे (वय २८, सध्या रा. वनदेव आंनदवन नगर, थेरगाव, मुळगाव जवळा जामखेड नगर) असे त्या महिलेचे नाव असून मृतदेहाच्या मांडीवर खोलवर चटके दिल्याच्या खुणा आढळून आल्याने या प्रकरणाबाबत तर्क-वितर्क सुरु आहेत.अद्याप तरी वाकड पोलिसांकडे आकस्मिक



मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मेघा यांनी नऊ वर्षांपूर्वी अंतरजातीय प्रेम विवाह केला होता त्यांना पाच वर्षांचा एक मुलगा असून त्यांचे पती वाहन चालक आहेत. मात्र, मेघा यांचा मृत्यू नेमका कशाने झाला की तो घातपात आहे.

# छत्रपती शिवरायांचा विचार नसानसांत भिनला पाहिजे, तरंच देशावर लादला जाणारा मनुवाद संपवता येईल

## महाराजांचे विचार प्रत्येकाने आपल्या नसानसांत भिनवणे गरजेचे : तुषार कामठे

**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** अखंड पुरोगामी महाराष्ट्राचे आराध्य दैवत, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने पिंपरी चिंचवड शहरात मोठ्या जल्लोषात विविध उपक्रम व कार्यक्रम राबविण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पिंपरी चिंचवड शहर यांच्यावतीने शहरभरात विविध ठिकाणी आयोजित कार्यक्रमांना भेटी देऊन छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देण्यात आली. सुजलाम सुफलाम असं स्वराज्य निर्माण करणारे आपले छत्रपती शिवराय आणि असंख्य मावळ्यांच्या बलिदानाने आपल्या सर्वांना मिळालेला आपला अभेद्य पुरोगामी महाराष्ट्र आज मनुवादी सत्ताधाऱ्यांच्या हातात अडकला आहे. आज महाराजांनी रक्ताची शिंपण केलेल्या या महाराष्ट्रात शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला सर्वसामान्य जनता न्यायापासून व हक्कांपासून वंचित आहे, मनुवादी विचारांनी आंधळं झालेलं राज्यशासन व केंद्रशासन आपला हा शिवरायांचा पुरोगामी महाराष्ट्र गिळंकृत केल्याशिवाय राहणार नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आणि म्हणूनच छत्रपती शिवरायांची जयंती केवळ एक जल्लोषपूर्ण उत्सव म्हणून नव्हे तर महाराजांचे विचार व संस्कार प्रत्येकाने आपल्या नसानसांत भिनवणे गरजेचे आहे, छत्रपती शिवरायांच्या विचारांनीच आपण या मनुवादी राक्षसी शासनाचा विरोध करून त्यांना पराजित करू शकतो. आणि या आणीबाणीच्या लढाई मध्ये जाचक शासनाला धूळ चारण्यासाठी देशाच्या राजकारणातील सर्वोच्च अनुभवी मानबिंदु असलेले आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पिंपरी चिंचवडचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व असंख्य जनसमुदाय कटिबद्ध आहोत अशी परखड भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी आज शिवजयंतीच्या निमित्ताने व्यक्त केली. माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत धर यांनी यावेळी आजच पुण्यात खराडी येथे पार्किंगच्या वादातून गाडी पेटवत असताना बाजूला उभ्या असलेल्या एका महिला भगिणीला गावगुंडांनी पेट्रोल टाकून पेटवल्याच्या संतापजनक घटनेचा जाहीर निषेध व्यक्त करत आरोपींवर कठोरात कठोर कारवाईची मागणी केली. त्याचबरोबर राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यास सपशेल फेल ठरलेल्या गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची नैतिक जबाबदारी घरून तात्काळ राजीनामा द्यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने केली. जिजाऊ, सावित्री, रमाईच्या संस्कारांनी घडलेल्या महाराष्ट्रात भाजपच्या मनुवादी शासनाला अजीबात थारा दिला जाणार नाही.. आशा शब्दांत शिलवंत यांनी सत्ताधाऱ्यांचा निषेध केला. यावेळी भोसरी, लांडेवाडी, पिंपरी, एच. ए. कॉलनी पिंपरी, रहाटणी, जिजामाता हॉस्पिटल पिंपरी, पिंपरी गाव, डांगे चौक चिंचवड, फुगेवाडी आदी ठिकाणी जाऊन छत्रपती शिवरायांना मोठ्या जल्लोषपूर्ण वातावरणात अभिवादन करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष तुषार कामठे, कार्याध्यक्ष देवेंद्र तायडे, माजी नगरसेवक गणेश भोंडवे, सुलक्षणा शिलवंत, सागर चिंचवडे, विशाल जाधव, विनोद धुमाळ, गणेश काळे, प्रतीक जम, सागर वाघमारे, आशिष तायडे, लकी गालफडे तसेच शहरभरातील विविध ठिकाणी कार्यकर्ते, पदाधिकारी व शिवप्रेमी नागरिक महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# दुर्गा नगर एसआरए प्रकल्पातील मूळ झोपडीधारकांना घर द्या

## अन्यथा मनपा आयुक्त कार्यालयासमोर पुढील आठ दिवसानंतर तीव्र आंदोलन


**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** दुर्गा नगर एसआरए प्रकल्पाचे काम पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि झोपडपट्टी पुनर्वसन विभागाने सुरू केले आहे. दुर्गा नगर आणि शरद नगर येथील झोपडीधारकांसाठी ३६० सदनिका बांधून तयार आहेत. त्यापैकी काहीचे वाटप झाले आहे. परंतु दुर्गा नगर येथील झोपडी झोपडीधारकांना डावलून महानगरपालिकेतील झोपडपट्टी पुनर्वसन विभागातील कर्मचारी, अधिकारी, पोलीस व या भागातील पुढारी मंडळी मूळ झोपडीधारकांना डावलून बेकायदेशीररित्या दुर्गा नगर येथील त्यांच्या झोपड्या पाडत आहेत. याबाबत समन्वयक विलास घाडगे यांनी वेळोवेळी एसआरए अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासन आणि पोलिसांशी पत्रव्यवहार केला आहे. याबाबत माननीय उच्च न्यायालयात ज्ञानेश्वर पांडुरंग गारगोटे यांनी दावा दाखल केला असता माननीय उच्च न्यायालयाने एसआरए अधिकाऱ्यांना याबाबत चार आठवड्यात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. या अधिकाऱ्यांनी याविषयीचा अद्यापही अहवाल सादर केला नाही. ३५ झोपड्या बाकी आहेत त्या पाडण्यासाठी विकसक यांनी स्थानिक गुंड यांना हाताला धरून रात्री सात नंतर झोपड्या पाडण्याचे बेकायदेशीर काम केले आहे. या झोपडीधारकांमध्ये तीव्र असंतोष असून त्यांना त्यांच्या न्याय हक्काची झोपडी मिळालीच पाहिजे अशी मागणी करीत रविवारी दुर्गा नगर येथे प्रशासनाचा निषेध करण्यात आला.यावेळी विलास भागवत घाडगे, दीपक हणमंत हलूरकर, बाबासाहेब भगवान गोरे, अब्दुल जमादार, सीता विठ्ठल नांदवते, बाबासाहेब कदम, आतिश दिलीप कदम, प्रशांत दिलीप कदम, प्रमिला पांडुरंग शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी विलास भागवत घाडगे यांनी माध्यम प्रतिनिधीशी संवाद साधताना सांगितले की, रात्री अपरात्री दुर्गा नगर येथील उर्वरित झोपडीधारकांच्या झोपड्या पाडून त्यांच्यावर अन्याय केला आहे. याविषयी दुर्गा नगर येथील उर्वरित झोपडीधारकांनी रविवारी दुर्गा नगर येथे महानगरपालिकेचा निषेध करीत आंदोलन केले. तसेच मूळ झोपडीधारकांना सदनिका द्याव्यात अशी मागणी केली अन्यथा मनपा आयुक्त कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला. या ठिकाणी या सणाच्या अधिकाऱ्यांनी व मनपा अधिकाऱ्यांनी बोगस सर्वे केला आहे बोगस नोंदी केले आहेत मृत व्यक्तींच्या नावे बोगस खरेदी दाखवून दुसऱ्याच्या नावे खोटे खरेदीखत केले आहे.

# पवार-पाटील संघर्ष पुन्हा पेटला

## तिसरी पिढी समोरासमोर, काय आहे वादाचा इतिहास?

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पवार-पाटील वाद पुन्हा पेटण्याची शक्यता आहे. हर्षवर्धन पाटील यांच्या कन्या अंकिता पाटील यांनी थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर निशाणा साधला आहे.त्यांनी आमची फसवणूक केली, आमच्या पाठीत खंजीर खुपसला, मागच्या तिनही वेळेस त्यांनी शब्द देऊन फिरवला, त्यामुळे यावेळी जो कोणी उमेदवार असेल ते आमचं विधानसभेला काम करणार असतील तर लोकसभेला आम्ही त्यांच काम करू, असं अंकिता पाटील म्हणाल्या आहेत.





सध्या अजित पवार आणि हर्षवर्धन पाटील हे महायुतीमध्ये आहेत. मात्र, पवार-पाटील वाद हा सर्वश्रुत आहे. या दोन घराण्यांमधील वाद हा आत्ताचा नाही तर शरद पवार आणि शंकरराव पाटलांपासूनचा आहे. त्यामुळे या दोन्ही घराण्याचा राजकीय इतिहास नेमका काय? इंदापूरमधला दोन्ही घराण्याचा वाद काय आणि याचा महायुतीवर कसा हे आपण जाणून घेऊया. पाटील घराणं इंदापुर मधलं मोठं राजकीय घराणं. इंदापुर हा बारामती लोकसभेचा भाग. आणि बारामतीत कोणाचा शिक्का चालतो हे काही नव्यानं सांगायला नको.तर शंकरराव पाटील हे काँग्रेसचे मातब्बर नेते. १९८० मध्ये ते बारामतीचे खासदार म्हणून लोकसभेवर गेले. दरम्यान १९८४ साली शरद पवारांनी शंकरराव पाटलांचा पराभव केला. त्यावेळी समाजवादी काँग्रेस होतं. पण त्यानंतर १९८५ ला शरद पवारांनी लोकसभेचा राजीनामा दिला आणि पोटनिवडणूक लागली . पुन्हा काँग्रेसनं शंकरराव पाटलांनी संधी दिली आणि त्यांच्याविरोधात जनता पक्षाचे संभाजीराव काकडे होते. पण या निवडणूकीत शरद पवारांनी शंकरराव पाटलांऐवजी संभाजीराव काकडेंना पाठिंबा दिला. त्यानंतर १९८९ साली पक्षानं त्यांना पुन्हा संधी दिली. हा मतदारसंघ काँग्रेसचा आणि शंकरराव पाटलांचा चांगलाच समर्थक होता. त्यामुळे १९९१ सालच्या लोकसभेवेळीही काँग्रेसमधून शंकरराव पाटलांचे नाव समोर येत होतं. पण यावेळी शरद पवारांनी हस्तक्षेप केला आणि पाटलांच तिकीट कापण्यात आल्याचं बोललं जातं. आणि यावेळी संधी मिळाली ती अजित पवारांना. तिथुनच पवार विरुद्ध पाटील घराण्याचा वाद सुरु झाला.१९९४ साली हर्षवर्धन पाटलांना पुणे जिल्हा परिषद लढवायची होती. पण यावेळी हस्तक्षेप केला अजित पवारांनी.

आणि काँग्रेसनं पाटलांचं तिकीट नाकारलं. पाटलांच्या डोक्यात याचा राग होता. तेव्हा काँग्रेसविरोधात अपक्ष उभं राहून हर्षवर्धन पाटील जिल्हा परिषद निवडणूकीत विजयी झाले.त्यानंतर हर्षवर्धन पाटील आमदारकीच्या मैदानात उतरले. काँग्रेसकडून त्यांना निवडणूक लढवायची होती. पण काँग्रेसनं तिकीट नाकारलं त्यामुळे पाटलांनी अपक्ष निवडणूक लढवली आणि जिंकूनही आले. त्यानंतर पाटलांनी २ वेळा म्हणजे १९९९, २००४. साली अपक्ष म्हणूनच निवडणूक लढवली आणि जिंकलीही. पण या दरम्यान काँग्रेसचा बालेकिल्ला असणारा इंदापुर भाग पक्षापासून दूर जात असल्याचं बघून पक्षानं हर्षवर्धन पाटलांना २००९ साली उमेदवारी दिला आणि पाटील आमदार म्हणून निवडूण आले.पण यातंच संघर्ष सुरु झाला तो अजित पवार आणि हर्षवर्धन पाटलांचा. २०१४ आणि २०१९ साली अजित पवारांनी हर्षवर्धन पाटलांच्या विरोधात दत्ता भरणे यांच्या पाठिमागे ताकद लावली आणि हर्षवर्धन पाटील यांचा पराभव केला.

### लोकांच्या तरुणांच्या गाठीभेटी

» एकप्रकारे अजित पवारांनी इंदापुरच्या जागेवर आपलाच ताबा सांगितला. २०१९ साली अजित पवारांनी इंदापुरात केलेलं भाषण चांगलंच गाजलं होत. ज्यात अजित पवार म्हणाले होते की, वाट्टेल ते झालं तरी इंदापुरची जागा राष्ट्रवादीची सोडली जाणार नाही. भले आघाडी नाही झाली तरी बेहत्तर हा अजित पवारचा शब्द आहे.'आता पवार– पाटील घराण्यच्या या वादात तिसरी पिढी सुद्धा उतरलीये. ती म्हणजे अंकिता पाटील आणि राजवर्धन पाटील. काही दिवसांपासून अंकिता पाटील या मैदानात सक्रिय झाल्यात. बारामती लोकसभेला त्या मैदानात उतरणार अशी चर्चाही होती. निर्धार... बारामती भाजपमय करण्याचा! ही त्यांची सोशल मिडीया पोस्टही चांगलीच चर्चेत आली होती. बारामती मतदारसंघात त्या फिरताना आणि लोकांच्या तरुणांच्या गाठीभेटी घेताना त्या पहायला मिळाल्या होत्या.

# अजित पवारांची भावनिक एक्सप्रेस सुरु होताच

## बारामतीत शिवजयंतीला सुप्रिया सुळेंच्या प्रचाराचा नारळ फुटला!

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

अजित पवार यांनी सलग दोनवेळा बारामती लोकसभेसाठी भावनिक आवाहन केल्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून सुद्धा बारामती खासदार सुप्रिया सुळे यांचा प्रचार सुरू करण्यात आला आहे. आज (१९ फेब्रुवारी) छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचा मूहुर्त साधत महाविकास आघाडीकडून सुप्रिया सुळेंचा प्रचार सुरू करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर पक्ष व चिन्ह उपमुख्यमंत्री अजित पवार गटाकडे गेलं आहे. या पार्श्वभूमीवर बारामती लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत काय निकाल लागेल? याकडे महाराष्ट्रासह देशाचे लक्ष आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लोकसभेला माझ्या विचाराचा उमेदवार निवडून नाही दिला तर मी विधानसभा लढवणार नसल्याचे वक्तव्य केले होते. असे असतानाच विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांच्या प्रचारार्थ लोकसभा निवडणुकीपूर्वीच बारामतीत प्रचाराचे बिगुल वाजले आहे. दुसरीकडे, घरातील व्यक्ती माझ्याविरुद्ध लढली तर काय हरकत नसल्याचे म्हटले आहे. त्या आज बोलताना म्हणाल्या की, माझं काम बघा, माझ्यावर भ्रष्टाचार कधीच आरोप झाला नाही. मी मुख्यमंत्री होण्याचा विषय येतो कुठे? मी आजपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसकडे बारामती लोकसभा तिकीट मागितले आहे. लोकशाही मत मांडण्याचा अधिकार असून विरोधक दिलदार असला पाहिजे. वैचारिक लढाई असल्यास घरातील व्यक्ती माझ्याविरुद्ध लढली तरी काय हरकत नाही. अजित पवार यांनी सेल्फीवरून केलेल्या टीकेवरून सुप्रिया सुळे यांनी प्रत्युत्तर दिले. सगळे आई वडील म्हणतात की मुलांना सांगितलं आहे फॉर्म भरून सेल्फी काढून पाठवायला. रेल्वे स्टेशन, शाळा, सगळीकडे. प्रधानमंत्री सांगतात सेल्फी काढा. एखादा सेल्फी काढून व्यक्ती खुश होते, तो आनंद वेगळाच असतो, असा टोला त्यांनी अजित पवारांना लगावला. दरम्यान, सुप्रिया सुळे आणि शरद पवारांनी जुन्या जाणत्या नेत्यांच्या भेटीगाठी घेण्यास सुरुवात केली आहे. शरद पवारांनी बारामतीत पृथ्वीराज जाचक यांची भेट घेतली.

# कांदा उत्पादकांची कुचेष्टा केल्याचा शेतकरी संघटनेचा आरोप

## निर्यातबंदी उठवल्याच्या अधिसूचनेची प्रतीक्षाच

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** एकीकडे मुख्यमंत्री, महसूल मंत्री, केंद्रीय मंत्री कांद्यावरील निर्यातबंदी उठवल्याचे सांगतात आणि दुसरीकडे अशी कोणतीही अधिसूचना केंद्र सरकारकडून काढली जात नाही. ही कांदा उत्पादक शेतकऱ्यांची कुचेष्टा तसेच फसवणूक आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया कांदा उत्पादक शेतकरी, शेतकरी संघटना आणि अभ्यासकांमधून व्यक्त होत आहे.केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या मंत्री समितीच्या बैठकीत कांदा निर्यातीवरील निर्बंध उठवून केंद्र सरकारने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिल्याचा दावा रविवारी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री



डॉ. भारती पवार यांनी केला होता. प्रत्यक्षात केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाने याबाबत कोणतीही अधिसूचना काढली नाही किंवा अधिकृतरित्या कोणतीही माहिती दिली नाही. निर्यातबंदी लादताना रात्री-अपरात्री अधिसूचना काढणारे केंद्र सरकार आता का गप्प आहे?, असा सवाल कांदा उत्पादक संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी केला आहे.निर्यातबंदीनंतर कांदा मातीमोल झाला आहे. कांदा विक्रीतून उत्पादन खर्चही निघत नाही. अशा अवस्थेत निर्यातबंदी उठवून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज असताना केंद्र सरकार कांदा उत्पादकांच्या जखमेवर मीठ चोळत आहे, असा आरोप त्यांनी केला. आम्हाला कांद्याला १००-२०० रुपये प्रति किलो इतका राक्षसी भाव नको आहे, पण किमान ३० रुपये किलो इतका सरासरी भाव तरी शेतकऱ्यांना द्या. यापुढे आम्ही शेतीत कोणते पीक घ्यायचे हे ही सरकारनेच सांगावे, असेही भारत दिघोळे यांनी म्हटले आहे. शरद जोशी स्थापित शेतकरी संघटनेचे अध्यक्ष ललित बहाळे-पाटील म्हणाले, की कांदा निर्यातीतील हस्तक्षेपच चुकीचा आहे. निर्यात बंदी हा अर्थद्रोह आहे. बाजार समिती कायद्यातून भाजीपाला आणि फळे वगळण्यात आली आहेत. त्यामुळे आता कांदा विक्रीसाठी बाजार समितीत जाण्याची गरजच नाही. शेतकरी, ग्राहकांनी शेतकऱ्यांच्या बांधावर येऊन कांदा खरेदी करावी. देशातून २०२२-२३ मध्ये ४,५२२ कोटी रुपये मूल्य असलेला २५.२ लाख टन कांदा निर्यात झाला. त्यात एकट्या नाशिक जिल्ह्याचा वाटा ६० टक्के होता. नाशिक जिल्ह्यातील एकूण उत्पादनातील एक तृतीयांश कांद्याची निर्यात होते. या पार्श्वभूमीवर, निर्यात ठप्प होणे हे आर्थिकदृष्ट्या नुकसानीचे असते. निर्यातबंदीने बाजारभावावर दबाव येतो. निर्यात बंदीमुळे ८ डिसेंबर २०२३ ते फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत कांद्याचे बाजारभाव हजार ते बाराशे रुपये प्रति क्विंटलच्या आसपास राहिले आहेत. म्हणजेच, देशांतर्गत बाजारात पुरेसा पुरवठा होता आणि निर्यातबंदीचा निर्णय चुकला. जानेवारी ते मार्च या तिमाहीत उशिराचा खरीप आणि पूर्व रब्बी हंगामात झालेल्या पेरणी आणि प्रति हेक्टरी उत्पादकतेनुसार देशात मागणीपेक्षा पुरवठा जास्त असतानाही निर्यातबंदी झाली. आजवर चढत्या बाजारभावात निर्यातबंदी होत होती. मात्र, गेल्या वर्षी प्रथमच उतरत्या बाजारभावात निर्यातबंदी झाली आणि शेतकऱ्यांचे नुकसान झाले. केंद्रीय कृषी खात्याद्वारे दरमहा पेरणी व हेक्टरी उत्पादकतेबाबत शास्त्रीय पद्धतीने माहिती संकलन होऊन वस्तुनिष्ठ अहवाल सादर झाले पाहिजेत, असे मत शेती प्रश्नाचे अभ्यासक दीपक चव्हाण यांनी व्यक्त केले.

# निर्यात बंदीमुळे बासमती तांदळाच्या निर्यातीत मोठी वाढ

## आर्थिक वर्षाअखेरीस निर्यातीत १५ टक्क्यांनी वाढ शक्य

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** बिगर बासमती आणि तुकडा तांदळाच्या निर्यात बंदीमुळे बासमती तांदळाच्या निर्यातीत मोठी वाढ झाली आहे. एप्रिल ते डिसेंबर २०२३ मध्ये बासमतीच्या निर्यातीत ११ टक्क्यांनी वाढ झाल्याचे अपेडाने म्हटले आहे. आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंत मागील वर्षाच्या तुलनेत निर्यातीत वाढ १५ टक्क्यांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे.कृषी आणि प्रक्रियायुक्त खाद्य उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाने (अपेडा) दिलेल्या माहितीनुसार, एप्रिल ते डिसेंबर २०२३ या कालावधीत बासमती तांदळाच्या निर्यात मूल्यात १९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. निर्यात झालेल्या बासमतीचे मूल्य गेल्या आर्थिक वर्षीच्या याच कालावधीतील ३.३३ अब्ज डॉलर्सच्या तुलनेत ३.९७ अब्ज डॉलर्सवर पोहोचले. तसेच निर्यातीच्या प्रमाणातही (वजन) ११ टक्क्यांची लक्षणीय वाढ झाली आहे. गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील ३१.९८ लाख टनांवरून या वर्षी ३४.४३ लाख



टनांवर निर्यात झाली आहे. आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंत निर्यातीतील वाढ १५ टक्क्यांवर जाण्याचा अंदाज आहे.देशात उत्पादित होणाऱ्या बासमती तांदळाला जगातील प्रमुख बाजारपेठांमधून मोठी मागणी आहे. प्रामुख्याने इराण, इराक, सौदी अरेबिया, अमेरिका आणि संयुक्त अरब अमिरात या पाच देशांमध्ये बासमती तांदळाची मोठ्या प्रमाणात निर्यात होत आहे. पावसाळ्यात समाधानकारक पाऊस न झाल्याचा परिणाम म्हणून देशाच्या एकूण तांदूळ उत्पादनात घट येण्याचा अंदाज होता. त्यामुळे बिगर बासमती, तुकडा तांदळाच्या निर्यातीवर केंद्र सरकारने निर्बंध लादले आहेत. देशातून फक्त बासमती आणि २० टक्के निर्यात करासह उकडा तांदूळ निर्यातीला परवानगी आहे. त्यामुळे जगभरातील खवय्यांना देशातून निर्यात होणाऱ्या इंद्रायणी, कोलम, सोनामसुरी सारखा दर्जेदार तांदूळ मिळाला नाही. त्यामुळे नाईलाजाने त्यांनी बासमती तांदळाला पसंती दिली आहे. त्याचा परिणाम म्हणून बासमतीच्या निर्यातीत मोठी वाढ झाली आहे, अशी माहिती तांदळाचे निर्यातदार राजेश शहा यांनी दिली.दरवर्षी देशातून ३० ते ३५ लाख टन बासमतीची निर्यात होते. यंदा मार्चअखेर सुमारे ४० लाख टन बासमतीची निर्यात होण्याचा अंदाज आहे. निर्यातमूल्यातही मोठी वाढ होणार आहे. भारत जगाला बासमती तांदळाचा पुरवठा करणारा प्रमुख देश आहे. सरकारने बिगर बासमती आणि तुकडा तांदळावरील निर्यात बंदी उठविण्याची गरज आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये सुमारे १५० लाख टन बिगर बासमती तांदळाची निर्यात झाली होती, अशी मागणी तांदळाचे निर्यातदार धवल शहा यांनी केली आहे.